वाचले: १) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय थेरगाव यांचे दि.०५/०१/२०१९ चे पत्र
२) मा.अतिरिक्त, आयुक्त सो.यांचेकडील दि. २९/०१/२०१९ रोजीचा मंजुर प्रस्ताव.

---

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माशि/१/कावि/ १५० /२०१९,
दि. २९/०१/२०१९

विषय :- एस.एस.सी.बोर्ड परीक्षा केंद्र क्र. ११३८ केंद्र संचालक नेमणुकीबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागातंर्गत १८ माध्यमिक विद्यालये कार्यरत आहेत. माध्यमिक विद्यालय थेरगाव येथे मनपाचे माध्यमिक विद्यालय वाकड व खाजगी ०५ विद्यालयातील विद्यार्थी इ.१० वी च्या परीक्षेकरीता मा.वि.थेरगाव या विद्यालयात परीक्षा करीता केंद्र क्रमाक ११३८ आहे.थेरगाव केंद्र क्र.११३८ केंद्र संचालक म्हणुन मा.वि.थेरगाव चे मुख्याध्यापक कामकाज पाहत आहेत.

माध्यमिक विद्यालय थेरगाव या विद्यालयातील मुख्याध्यापक हे थेरगाव केंद्र क्र.११३८ केंद्र संचालक म्हणुन कामकाज करतात श्री.शिंदे सौदागर धर्मराज हे दि.३१/०३/२०१९ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.तसेच श्री.शिंदेएस.डी(मुख्याध्यापक) यांना विद्यालयाचे आर्थीक चार्ज चे कामकाज व विद्यालयाचे इतर कामकाज असल्याने केंद्र क्र.११३८ थेरगाव येथे केंद्र संचालक म्हणुन इतर मुख्याध्यापक यांची नेमणुक करणे आवश्यक आहे.

मी अतिरिक्त आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११०१८ या आदेशान्वये प्रशासकीय कामकाजाचे सोईचे दृष्टीने मुंबई प्रांतिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील प्रकरण ९ नियम ४८ (१) अन्वये केंद्र क्रमाक ११३८ एस.एस.सी. परीक्षा केंद्र संचालक म्हणुन श्री.उनवणे अशोक विष्णू मुख्याघ्यापक मा.वि.वाकड यांची नेमणुक करणेस मान्यता देत आहे.श्री.उनवणे अशोक विष्णू मुख्याघ्यापक यांनी केंद्र क्रमाक ११३८ एस.एस.सी. परीक्षा केंद्र संचालक म्हणुन कामकाज करावे, यापुर्वी केंद्र संचालकांना जे अधिकार दिलेले आहेत ते अधिकार वापरून परीक्षेचे संपुर्ण कामकाज श्री.उनवणे अशोक विष्णू मुख्याध्यापक यांनी करावे. याबाबत हयगय करू नये,याची स्पष्ट नोंद घ्यावी.

सही/-
अतिरिक्त, आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगर पालिका
पिंपरी ,पुणे - १८

प्रति,

श्री.उनवणे अशोक विष्णू
माध्यमिक विद्यालय वाकड

प्रत,

१)मा.विभागीय सचिव,
माध्यमिक व उच्च माध्यमिक महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ पुणे- ०५
२)मा.शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पुणे
३)प्रत - मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय थेरगाव

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे – १८

Scanned by CamScanner

वाचले: १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग संकीर्ण – २०१६ /प्र.क्र.३२०/टीएनटी-१ दि.०४ डिसेंबर -२०१८

२) मा.अतिरिक्त, आयुक्त सो.यांचेकडील दि.२९/०१/२०१९ रोजीचा मंजुर प्रस्ताव.

---

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माशि/१/कावि/ १५२ /२०१९,
दि. ३० /०१/२०१९

विषय :- 'मुख्याध्यापक' या पदाचे अतिरिक्त पदभाराबाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागातंर्गत १८ माध्यमिक विद्यालये कार्यरत आहेत. सध्यस्थितीत १८ माध्यमिक विद्यालयापैकी माध्यमिक विद्यालय संततुकारामनगर येथे मुख्याध्यापक पदावर कार्यरत असलेले मुख्याध्यापिका श्रीम.रांगणेकर माधुरी नंदकिशोर ह्या दि.३१/०१/२०१९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.वाचले क्र.०१ च्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकिय व शालेय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने दिनांक ०१/०२/२०१९ पासून तात्पुरत्या स्वरुपात माध्यमिक विद्यालय संततुकारामनगर या विद्यालयातील जेष्ठ शिक्षिका श्रीम.वैशपायन हेमा नितीन यांना मुख्याध्यापक पदाचे अतिरिक्त कामकाज देणेत येत आहे.

| अक्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | सध्याचे माध्यमिक विद्यालय | मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त पदभार सोपविणेत आलेले माध्यमिक विद्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम.वैशंपायन हेमा नितीन | सहाय्यक शिक्षिका | मा.वि.संततुकारामनगर | मा.वि.संततुकारामनगर |

सबब, मी अतिरिक्त आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८ या आदेशान्वये कामकाजाचे सोईचे दृष्टीने मुंबई प्रांतिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील प्रकरण ९ नियंत्रण ४८ (१) अन्वये दिनांक दिनांक ०१/०२/२०१९ पासुन मुख्याध्यापक या पदाचा अतिरिक्त पदभार सहाय्यक शिक्षिका श्रीम.वैशपायन हेमा नितीन यांचेकडे पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरता सोपविण्यास मान्यत देत आहे. सदरचा पदभार सोपविल्यामुळे मुख्याध्यापक या पदास यापूर्वी वेळोवेळी सोपविण्यात आलेले आधिकार यापुढे श्रीम.वैशपायन हेमा नितीन यांनी वापरावेत.श्रीम.रांगणेकर माधुरी नंदकिशोर सेवानिवृत्त मुख्याध्यापिका यांच्याकडुन श्रीम.वैशपायन हेमा नितीन यांनी लेखी स्वरुपात मुख्याध्यापक पदाचा चार्ज घेणेत येऊन त्याची एक प्रत मुख्य कार्यालयास सादर करावी,विद्यालयाच्या कुठल्याही प्रकारच्या चार्जची जबाबदारी श्रीम.वैशपायन हेमा नितीन यांच्याकडे राहील, याची नोंद घ्यावी.तसेच उपरोक्त नमूद केलेल सहाय्यक शिक्षक यांचेकडे मुख्याध्यापक या पदाचा अतिरिक्त पदभार सोपविल्यामुळे त्यांनी त्यांचे मूळ पदाचे कामकाज संभाळून मुख्याध्यापक पदाचे कामकाज करणेत यावे.

सही/-
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगर पालिका
पिंपरी ,पुणे - १८

प्रति,

श्रीम.वैशपायन हेमा नितीन

सहाय्यक शिक्षिका, माध्यमिक विद्यालय संततुकारामनगर

प्रत - मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय संततुकारामनगर

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – पुणे -१८

Scanned by CamScanner